# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/11/2021 (शनिवार)

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 27/05/2019 चे 01.27 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अप. क्र. 299/2019 कलम 341, 354 (अ), 323 भादवी सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 26/05/2019 चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान वय 13 वर्षीय पीडीत/फिर्यादी मुलगी हि किराणा दुकानात जात असतांना तिला आरोपी नामे – ज्ञानेश्वर चिरकुटराव गेडाम, वय 31 वर्ष, रा. चिचोली पठार ता. हिंगणा जि. नागपूर हा तिला रस्त्यात अडवा होवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक 27/05/2019 रोजी अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. श्याम गव्हाणे, पो.स्टे. कोंढाळी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 20/11/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. आर. आर. पठारे, जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 354 (अ) भादंवि. मध्ये 6 महिन्याची शिक्षा व 2,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, कलम 341 भादंवि मध्ये एका महिन्याची साधी शिक्षा व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, तसेच कलम 323 भादंवि मध्ये 1 महिन्याची साधी शिक्षा व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, तसेच कलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 3 वर्षाचर साधी कैद व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 03 महिन्याची साधी कैद शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. भवानीप्रसाद मिश्रा, पोशि श्री. माधव गुट्टे यांनी मदत केली आहे.

### घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावरील मौजा हिंगणा येथे दि. 18/11/2021 चे 12.00 वा. चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मंगला नागसेन चाहांदे वय 36 वर्ष रा. हिंगणा ता. मौदा यांचे राहते घराचे अज्ञात आरोपीने दरवाज्याची साखळी उघडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेले स्टील च्या डब्यात नगदी 40 रू. व जुने वापरते सोन्याचे दागिने कि. 15,300/–रू. असा एकुण कि. 15,340/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगळे मो. क्र. 9923463461 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा वडोदा येथे दि. 18/11/2021 चे 22.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीधर भिकाराम गभणे वय 36 वर्ष रा. वडोदा ता. कामठी यांच्या घरासमोर पोर्चमध्ये ठेवलेली त्यांची एम. एच– 40/एच– 3859 क्रमांकाची बजाज डिस्कवर मोटरसायकल कि. 20,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत खैरी ते झिल्पा चे मधातील पुलीयावर काटोल येथे दिनांक 17/11/2021 चे 19:00 वा. ते दिनांक 17/11/2021 चे 19.15 वा. दरम्यान हर्षल महेश काळे (मृतक)वय 9 वर्ष याचा आरोपी नामे– महेश रामरावजी काळे रा. शिरपुर बोके ता. आर्वी जि. वर्धा हा वडील असून त्याचे गाडी क्र. एम.एच.– 27/एएच– 4898 वर डबलसिट बसुन जात होता. खैरी ते झिल्पा चे मधातील पुलीयावर मोटरसायकल स्लिप होवुन पडल्याने हर्षल काळे याच्या नाकातुन, कानातुन रक्त वाहत होते. त्याच्या डोक्याला मुकामार लागला होता. त्यास उपचाराकरिता प्रथम ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारादरम्यान मरण पावला. पो.स्टे. काटोल ला कागदपत्रे प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गजानन रामकृष्ण काळे, रा. शिरपुर बोके ता. आर्वी जि. वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रशांत लभाने मो.नं. 9823433863हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील मौजा सावंगी संजु तभाने यांचे शेताचे विहीरीत येथे दिनांक 19/11/2021 चे 06/00 वा पूर्वी नितेश बिरजु यदुवसी (मृतक), वय 22 वर्ष रा. सावंगी संजु तभाने यांचे घरी ता. कळमेश्वर जि. नागपुर याने सावंगी शिवारातील संजु तभाने यांचे शेतातील विहीरीत मध्ये उडी घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बिरजु दुबेलाल यदुवंशी (मृतक), वय 48 वर्ष रा. सावंगी संजु तभाने यांचे घरी ता. कळमेश्वर जि. नागपुर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार जिजकार मो.क्र. 8766901869 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर